प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Satara Edition 25 Feb 2025_009
25 Feb 2025

# मराठी भाषा गौरवदिनी साहित्यिकांचा सन्मान

## छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये गुरूवारी विविध स्पर्धांचे आयोजन

**सातारा, दि. २४ (प्रतिनिधी)** - येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळ व घटक महाविद्यालय छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कॉलेजच्या बॅरिस्टर पी. जी पाटील सभागृहात मराठी भाषा गौरव दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभात मान्यवर लेखकाचे व्याख्यान व गौरव समारंभ आयोजित केला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व भाषिक कौशल्याच्या आविष्काराला संधी मिळण्यासाठी मराठी वक्तृत्व, रांगोळी, कविता रसग्रहण, पुस्तक परीक्षण, निबंध इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय व छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी सहभागी होतील.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रयत शिक्षण संस्थेचे ऑडिट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, विद्यापीठाचे पदाधिकारी, प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे.भाषा मंडळाचे प्रभारी संचालक, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांच्याकडे लेखक, कवींनी नावे नोंदवावीत.

आपल्या प्रकाशित ग्रंथ, कलाकृतीची माहिती लेखी स्वरुपात द्यावी, त्याची नोंद मराठी विभागात ठेवली जाणार आहे. हे ग्रंथ विद्यार्थी व अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. भाषा मंडळ व मराठी विभागाने मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी कोणकोणते उपक्रम व कार्यक्रम घ्यावेत याबाबत साहित्यिकांनी आपल्या सूचना लेखी स्वरुपात मराठी विभागात द्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# मराठी भाषा गौरवदिनी सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचा सन्मान

## छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये विविध प्रातिभ स्पर्धांचे आयोजन

*** महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**सातारा, दि. २३ फेब्रुवारी:** येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळ व घटक महाविद्यालय छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी कॉलेजच्या बॅरिस्टर पी.जी पाटील सभागृहात 'मराठी भाषा गौरव दिन' समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे.




या समारंभात मान्यवर लेखकाचे व्याख्यान आयोजित केले असून मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या अग्रणी व घटक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व भाषिक कौशल्याचा आविष्कार करण्यास संधी मिळण्यासाठी मराठी वक्तृत्व, रांगोळी, कविता रसग्रहण, पुस्तक परीक्षण, निबंध इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय व छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी सहभागी होतील.

या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रयत शिक्षण संस्थेचे ऑडीट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, विद्यापीठाचे पदाधिकारी, प्रमुख अतिथी वक्ते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून भाषा मंडळ व मराठी विभागाने सातारा जिल्ह्यातील साहित्यिक यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्याचे ठरविलेले आहे. तरी जे या समारंभास उपस्थित राहणार आहेत,अशा लेखक ,कवी यांनी भाषा मंडळाचे प्रभारी संचालक, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष वाघमारे मोबाईल नंबर ९८९०७२६४४० यांचेकडे आपली नावे नोंदवावीत. तसेच आपल्या प्रकाशित ग्रंथ, कलाकृती यांची माहिती लेखी स्वरुपात द्यावी तसेच प्रकाशित ग्रंथ छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागात देण्यात यावे.

मराठी भाषेतून ज्यांनी साहित्य ग्रंथ प्रकाशित केले त्याची नोंद मराठी विभागात ठेवली जाणार आहे. हे ग्रंथ विद्यार्थी व अभ्यासक यांना हे ग्रंथ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे नोंदणी केलेल्या साहित्यिक यांनाच मराठी भाषा गौरव दिन समारंभात प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान केला जाईल.

भाषा मंडळ व मराठी विभाग यांनी मराठी भाषा संवर्धन करण्यासाठी कोणकोणते उपक्रम व कार्यक्रम घ्यावेत यासाठी या साहित्यिकानी आपल्या सूचना लेखी स्वरुपात मराठी विभागात द्याव्यात असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचा सन्मान.






## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा
(राज्य सार्वजनिक विद्यापीठ)

## छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
घटक महाविद्यालय

### अर्थशास्त्र विभाग आयोजित

# राज्यस्तरीय खुली प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२४-२५

### सस्नेह निमंत्रण

प्रति,
सर्व सहकारी प्राध्यापक
बंधू, भगिनी

महोदय,

आपणास अगत्यपूर्वक निमंत्रित करताना आम्हास मन:पूर्वक आनंद वाटतो की, आपल्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे "भारतीय अर्थव्यवस्था" या विषयावर आधारित "राज्यस्तरीय खुली प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२५" या महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण अशा स्पर्धेचे आयोजन मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे पंधरावे वर्ष असून सदर स्पर्धेचा उद्घाटन समारंभ मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब, सहसचिव (ऑडिट), रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली स. १०.३० वा. संपन्न होत आहे. तरी आपण व आपल्या विभागातील सर्व सहकारी यांची या उद्घाटन समारंभास प्रार्थनीय अशी उपस्थिती लाभावी. कार्यक्रमास आपण उपस्थित राहून आयोजक विद्यार्थी, सहभागी स्पर्धक यांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी. तसेच दिवसभरात पार पडणाऱ्या स्पर्धेलाही सदिच्छा भेट द्यावी. ही नम्र विनंती.

आपला स्नेहांकित
प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख




Karmaveer Bhaurao Patil University, Satara
(State Public University)
Chhatrapati Shivaji College, Satara
(Constituent College)
Department of Economics & Internal Quality Assurance Cell
Jointly Organized
State Level Quiz Competition on Indian Economy
Date -25/02/2025
Time-10.00 am



लोकमत

# गोमंतकीय संस्कृतीचे दर्शन

## सातारावासीय झाले मंत्रमुग्ध : पारंपरिक कलेला मिळाले मोठे व्यासपीठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**साखळी :** मराठी विभाग, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी आणि श्री छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात घडविलेल्या गोमंतकीय संस्कृतीच्या दर्शनाने सातारावासीय मंत्रमुग्ध झाले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील मराठी विभागातील १३ विद्यार्थी व एक प्राध्यापक सहभागी झालेले होते. या संपूर्ण विद्यार्थ्यांचे नेतृत्व मराठी विभागातील प्रा. सुशा होंडक उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ. सुभाष वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना रयत शिक्षण संस्था व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाविषयी माहिती दिली.र यांनी केले.

दरम्यान, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या पारंपरिक कलेचे दर्शन घडवून आणले. त्यामुळे उपस्थित सत्तरीवासीयांना मोठी पर्वणीच मिळाली. या कार्यक्रमामुळे पारंपरिक कलेला मोठे व्यासपीठ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ. सुभाष वाघमारे यांच्यासोबत साखळी सरकारी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी.

### गोमंतकीय लोकसंस्कृतीचे दर्शन

विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाऱ्हाणे, शिगमोत्सवातील लोकगीते, गोमंतकातील कवींच्या कविता, गवळण, कोंकणी भाषेतील गीते, धालो यांचे अद्वितीय आणि अद्भुत सादरीकरण करून सातारकरांना मंत्रमुग्ध केले. यावेळी प्रा. सुशा होंडकर यांनी गोमंतकीय संस्कृतीविषयी अभ्यासपूर्ण माहिती दिली.

"

गोमंतकीय संस्कृती, इतिहास, लोकपरंपरा यांचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम साखळी सरकारी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे घडविला, ही अत्यंत कौतुकास्पद बाब असून सामंजस्य करारांतर्गत यापुढेही असे उपक्रम राबविले जातील.

**डॉ. नामदेव गावस**, प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी.

### परिसंवादात सहभाग, ऐतिहासिक स्थळांना भेटी

१ 'जागतिक भाषा साहित्यात प्रतिबिंबित वंचित व शोषितांचे जीवन' या विषयावरील परिसंवादात साखळी सरकारी महाविद्यालयातील मराठी विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभाग घेतला.

२ तसेच सातारा परिसरातील छत्रपती शिवाजी संग्रहालय, सज्जनगड, अजिंक्यतारा किल्ला आदी ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. विद्यार्थी व प्राध्यापक यांना साखळी सरकारी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विभाग प्रमुख प्रो.डॉ. स्नेहा महांबरे यांचे मार्गदर्शन लाभले.